स्थायी समितीच्या **सोमवार** दिनांक **28–03–2011** रोजी सकाळी **10–00** वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. संदिप दिवाकर जोशी | अध्यक्ष |
| 2. | सौ. अरुणा जगदीश ग्वालबंशी | सदस्य |
| 3. | श्रीमती ममता ठाकुर | सदस्या |
| 4. | श्री. दिपक पटेल | सदस्य |
| 5. | श्री. शेषराव गोतमारे | सदस्य |
| 6. | श्रीमती शोभा पटेल | सदस्य |
| 7. | श्री. सुरेश दामोधर तळवेकर | सदस्य |
| 8. | श्री. राजेश श्रीनिवास माटे | सदस्य |
| 9. | श्री. दिपक दयाराम पेंदाम | सदस्य |
| 10. | श्री. किशोर गजभिये | सदस्य |
| 11. | श्री. संदीप प्रल्हाद सहारे | सदस्य |
| 12. | श्री. मधुकर नत्थुजी कांबळे | सदस्य |
| 13. | श्री. सतिश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 14. | श्री. राजेश रामचरण जरगर | सदस्य |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 1. | श्री. रवींद्र डोळस | सदस्य |
| 2. | श्री. दिपक चौधरी | सदस्य |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. विष्णुपद बुटे अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

<u>ठराव क्रमांक 990</u> :— दानागंज येथे हरीहर मंदीर जवळ म.न.पा. च्या जागेवर B.O.T. तत्वावर शॉपींग मॉल बांधण्याकरीता फेर निविदा मध्ये वाटाघाटी अंतर्गत प्राप्त झालेल्या सर्वात उच्चतम दराची मे. विश्वराज इन्फ्रास्ट्रक्चर लि. (J.v.) नागपूर यांची रु. 162.0 कोटी ची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 991</u> :— वार्ड क्र. 128, मधील ताजम्मा कॉलोनी, सक्करदरा व बिडीपेठ येथील अंतर्गत रस्त्याचे डांबरीकरण व फुटपाथचे करण्याचे कामास्तव प्राप्त निविदापैकी मे. विनोद ज्ञानेश्वर सांभारे यांची प्राकलनीय दरापेक्षा 15.15 टक्के कमी दराची रु. 12,71,901/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 992</u> :— नेहरु नगर झोन क्र. 5 येथील जगनाडे चौक ते के.डी.के. रस्ता मधुन जाणाऱ्या नाल्यावर बॉक्स कल्व्हर्ट चे बांधकामास्तव प्राप्त निविदापैकी मे. एस.के. ईन्टरप्रार्यजेस, नागपूर यांची प्राकलनीय दरापेक्षा 19.7 टक्के कमी दराची रु. 18,21,204/— रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 993</u> :— वार्ड क्र. 116, येथे सहकारनगर दहन घाट बांधणे व सौंदर्याकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. लक्ष्मीनारायण कंन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 13.5 टक्के कमी दराची रु. 17,29,740/— ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 994</u> :— वार्ड क्र. 77, तुळशीबाग, राहातेकरवाडी, अरबवाडा भागामध्ये सिमेंट रस्ता बांधण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे.आर.बी. केवलरामानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 27.99 टक्के कमी दराची रु. 10,80,118/— ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 995</u> :— वार्ड क्र. 108, येथे विविध ठिकाणी रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. आर.एम. गोपलानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 25.26 टक्के कमी दराची रु. 22,41,284/— ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 996</u> :– वार्ड क्र. 77, हर्षे लॉन समोरिल तुळसीबाग नागनदी जवळील मैदानाला संरक्षण भिंत (तारेचे कुंपण) तयार करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. मयुर कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय दरापेक्षा 23.87 टक्के कमी दराची रु. 9,13,514/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 997</u> :– वार्ड क्र. 88, हम्पायर्ड रोड ते रहाटे कॉलोनी चौकापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. एस.के. गुरुबक्षानी यांची प्राकलनीय दरापेक्षा 28.25 टक्के कमी दराची रु. 25,10,863/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 998</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता मनुष्यबळ व शिडीसह वाहन उपलब्ध करण्याकरीता रु. 67,73,800/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 999</u> :– नागपूर शहरातील पथदिव्यांच्या दुरुस्तीकरीता लॅम्पस, चोकस् व इग्नेटर्स इत्यादी साहित्य खरेदी करण्याकरीता रु. 1,00,00,000/– च्या प्राकलनास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1000</u> :– वार्ड क्र. 122, मधील जोगीनगर स्लममध्ये घरोघरी नळ योजनेअंतर्गत वितरण जलवाहिन्या टाकून पाणीपुरवठा उपलब्ध करुन देण्याच्या कामाच्या ई–निविदा बोलाविण्यात आल्या असता मे. सेंट्रल इंडिया इंजिनिअरींग यांची प्राकलनिय दरापेक्षा 0.1 टक्के कमी दराची रु. 44,16,283/– किमतीची एकमेव निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1001</u> :– जवाहरलाल नेहरु नागरी पुर्ननिर्माण अभियानांतर्गत मंजूर पाणी लेखा परिक्षण प्रकल्पात समाविष्ठ धरमपेठ झोन मधील प्रात्यक्षिक क्षेत्रामध्ये प्रायोगिक तत्वावर अबाधित पाणीपुरवठा करणे, हिशोबबाहय पाण्याचे प्रमाण कमी करणे आणि उपभोक्ता सेवेत सुधारणा करण्याचे कामासंबंधात खाली प्रस्तावांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. मंजूर Rehabilitation Cost रु. 17,49,95,735/– ऐवजी Extra आयटम व जास्तीचे कामाचे रु. 3,68,15,062/– चे अतिरीक्त खर्चासह (रु. 17,49,95,735

\+ रु. 3,68,15,062/–) = रु. 21,18,10,797/– Rehabilitation Cost ला मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. सुधारित Rehabilitation Cost रु. 21,18,10,797/– आणि Technical Sevrvices + O&M खर्च रु. 10,20,64,453/– सह या कामाला लागणारे एकूण रु. 31,38,75,250 च्या सुधारित खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1002</u> :– वार्ड क्र. 108 व 109 मधील चुनाभट्टी ते नरेंन्द्र पुल, रिंग रोड व गजानन नगर टी पॉईंट ते देवनगर चौकापर्यंत रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे.ओ.जी. बजाज यांची प्राकलनीय दरापेक्षा 27.99 टक्के कमी दराची रु. 32,37,980/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1003</u> :– आय. आर.डि.पी अंतर्गत धंतोली झोन क्र.4 मधील फुटपाथ व डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता **मे.डी.सी. गुरूबक्षानी** यांचेकडून त्यांचे मंजुर दरापेक्षा 5 % कमी म्हणजेच प्राकलनिय दरापेक्षा 19.65 % अधिक दरावर तथा आजच्या सी.एस.आर.दरानुसार रामेश्वरी रोड,मानवता हायस्कुल ते शताब्दी चौकापर्यंत रस्ता दुरूस्तीचे रू. 4898870/– चे काम करून घेण्यास तसेच वार्ड क्र.120 छत्रपती सभागृहासमोरील आय.आर.डी.पी रस्त्याची दुरूस्ती करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या रू. 2499560/–च्या प्राकलणास मान्यता प्रदान करून दुसरे कंत्राटदार मे.पी.एम.ए. **कंन्स्ट्रक्शन** .यांचे जुने मंजुर दरापेक्षा 5% कमी दराने म्हणजेच 19.65 % अधिक दरावर तथा आजच्या सी.एस.आर दराने हे काम करून घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1004</u> :– वार्ड क. 28, गंगाबाग येथील नाग नदीला संरक्षण भिंतीचे बांधकामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. विनोद एम. मडावी, यांची प्राकलनीय दरापेक्षा 20.11 टक्के कमी दराची रू.12,00,747/– राशीची निविदा मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1005</u> :– वार्ड क. 63, अंतर्गत इतवारी तेलीपुरा, रेशमओली, भामटीपुरा आणि संतरजीपुरा येथील विकास करण्याचे कामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. 786 कन्स्ट्रक्शन ॲन्ड डेकोरेशन यांची प्राकलनिय दरापेक्षा 25.99 टक्के कमी दराची रु. 11,10,150/– राशीच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1006</u> :– वार्ड क्र. 25, नवी मंगळवारी (बिनाकी) येथे सी.सी.पेव्हमेंट रस्ते बांधकामास्तव प्राप्त निविदापैकी मे. द्वारका कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा 25.99 टक्के कमी दराची रु. 11,10,135/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1007</u> :– वार्ड क्र. 29, पारडी उपरे मोहल्ला येथील नाल्याच्या संरक्षक भिंतीचे बांधकामास्तव प्राप्त निम्नतम निविदाकार मे. विनोद एम. मडावी, यांची प्राकलनिय दरापेक्षा 19.65 टक्के कमी दराची रु. 12,04,447/– राशीच्या निविदेस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1008</u> :– वार्ड क्र. 73, जुनी मंगळवारी येथील जैसाववाडी येथे सामाजिक सभागृहाचे बांधकामाचे काम करण्यास्तव प्राप्त 3 निविदापैकी मे. न्यु विराज कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनिय दरापेक्षा 17.87 प्रतिशत ने कमी दराची रु. 17,10,652/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1009</u> :– वार्ड क्र. 22, ताज नगर येथील नाल्यावर मस्जिदच्या पुढे पुलाचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त 2 निविदापैकी मे. महेंद्र पी. सोनटक्के यांची प्राकलनिय दरापेक्षा 13.5 प्रतिशत ने कमी दराची रु. 17,26,043/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली. तसेच श्री. उदयदत्त गजभिये यांना प्रिटेंडर व पोस्ट टेंडर ॲक्टीव्हीटी करीता म.न.पा. चे प्रचलित धोरणानुसार कंसल्टंसी चार्जेस प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1010</u> :– वार्ड क्र. 39, बाळाभाऊपेठ व लष्करीबाग येथील रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम करण्यास्तव प्राप्त 4 निविदांपैकी मे. प्रेमचंद राचुमल यांची प्राकलनिय दरापेक्षा 21.33 प्रतिशत ने कमी दराची रु. 11,80,050/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 1011 :– वार्ड क्र. 72, येथील भाजीमंडी रोड, रामराव देऊळकर ते जगदीश हॉटेल पर्यत सिमेंट कॉक्रीट रोड बनविण्याचे कामास्तव प्राप्त 2 निविदांपैकी मे. बालाजी कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनिय दरापेक्षा 32.00 प्रतिशत ने कमी दराची रु. 10,19,280/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 1012 :– आय.आर.डी.पी.कोड नं. सी.ई–3 रेल्वे फिडर रोड, नाका नं. 3 बडकस चौक ते गांधी चौक, सेंटर एव्हेन्यु ते शहीद चौक इतवारी पर्यत रस्त्याचे डांबरीकरणाचे काम करण्यास्तव प्राप्त 7 निविदांपैकी मे. आर.एम.गोपलानी यांची प्राकलनिय दरापेक्षा 27.57 प्रतिशत ने कमी दराची रु. 65,12,691/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 1013 :– वार्ड क्र. 38, अंतर्गत अशोक चौक ते सिमेंट रोड आय. आर.डी.पी.रोडचे डांबरीकरणाचे काम करण्यास्तव प्राप्त 7 निविदापैकी मे. कुमार बिल्डर्स यांची प्राकलनिय दरांपेक्षा 24.99 प्रतिशत ने कमी दराची रु. 18,75,227/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 1014 :– वार्ड क्र. 07, येथील महेंद्रनगर जलकुंभ जवळील सिमेंट कॉक्रीट रस्त्याचे बांधकाम करण्यास्तव प्राप्त 7 निविदांपैकी मे. बिंद्रा कन्स्ट्रक्शन कंपनी यांची प्राकलनिय दरापेक्षा 26.22 प्रतिशत ने कमी दराची रु. 16,43,745/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

ठराव क्रमांक 1015 :– नागपूर म.न.पा.च्या प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेतील वर्ग 1 ते 12 पर्यंतच्या विद्यार्थ्याकरिता वहया/नोटबूक एकूण 49,446 विद्यार्थ्यांकरिता 1 रेघी 2,65,639 नग, 2 रेघी 18,041 नग, चार रेघी 30649 नग नोटबूक खरेदी करावयाचे आहे. खरेदी 'ई' निविदा मार्फत खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे. खरेदी कॅमलीन, नटराज इ. नांमाकीत कंपनी द्वारे उत्पादन करणाऱ्या कंपनीच्या अधिकृत विक्रेत्यास प्राधान्य देण्यात येईल. करिता नोटबूक 'ई' निविदा मागवून खरेदी करण्यास व या अनुषंगाने येणाऱ्या रु. 31 लाख (अक्षरी एकतीस लाख फक्त) च्या खर्चास प्रशासकिय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

खर्च पद क्र. 428 मधून करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 1016</u> :– नागपूर म.न.पा.च्या प्राथमिक, उच्च प्राथमिक माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयातील वर्ग 1 ते 12 च्या एकूण 49,446 विद्यार्थ्याकरिता प्रति विद्यार्थी 2 गणवेष प्रमाणे एकूण पांढरे कापड 1,63,506.7 मिटर (मनिला, ब्लाऊज, सलवार करिता) राखडी ग्रे कलर सुटिंग कापड 1,17,137 मिटर (हाफ पॅन्ट, फुल पॅन्ट, स्कर्ट व कुर्ता) ओढणी पांढरे कापड 60942 मिटर, एकूण कापड खर्च रु. 1,75,27,812/– व सिलाई खर्च रु. 52,88,062/– एकूण अपेक्षीत खर्च रु. 2,28,15,874/– खरेदी प्रधान सचिव वस्त्रोद्योग विभाग यांचे मार्फत नेमून दिलेल्या महामंडळाकडून मान्य दराने (महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळ किंवा महाराष्ट्र राज्य यंत्रमाग महामंडळ) करण्यात येईल. करिता गणवेष कापड खरेदी करण्याचे अनुषंगाने येणाऱ्या रु. 2,28,15,874/– (अक्षरी दोन कोटी अठ्ठावीस लक्ष पंधरा हजार आठशे चौऱ्याहत्तर फक्त) च्या खर्चास प्रशासकिय तसेच खरेदीस मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून महाराष्ट्र राज्य हातमाग महामंडळाकडुन खरेदी करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

खर्च पद क्र. 603 मधून करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 1017</u> :– नागपूर म.न.पा.च्या प्राथमिक, उच्च प्राथमिक व माध्यमिक शाळेतील वर्ग 1 ते 12 च्या एकूण 49446 विद्यार्थ्याकरिता बुट व बेल्ट खरेदी करावयाचे आहे. खरेदी शासन निर्णय क्र. भांखस 2002(2990) उद्योग–6 मंत्रालय, मुंबई दि. 04.02.2003 अन्वये सर्व प्रकारच्या चर्म वस्तू महामंडळाकडून (LIDCOM) खरेदी करणे बंधनकारक आहे.

करिता बुट व बेल्ट (LIDCOM) कडून खरेदी करण्यास व या अनुषंगाने येणाऱ्या रु. 1,54,69,008/– (अक्षरी कोटी चौपन लाख एकोणसत्तर हजार आठ फक्त) च्या खर्चास प्रशासकीय तसेच खरेदीस मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

खर्च पद क्र. 428 मधून करण्यात येईल.

<u>ठराव क्रमांक 1018</u> :– वार्ड क्र. 90 येथील रामबाग हाउसींग परिसरातील मोकळया जागेत सामाजिक सभागृह बांधण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. न्यु. विराज कंन्स्ट्रक्शन कं. यांची प्राकलनीय दरापेक्षा 1.89 टक्के कमी दराची रु. 47,84,987/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1019</u> :– वार्ड क्र. 90 धोबीघाट नाल्यावर मेन ग्रेटनागरोडवर पुल बांधण्याच्या कामाकरिता निविदा मागविण्यात आल्या असता प्राप्त निविदेमध्ये मे. बिंद्रा कंन्स्ट्रक्शन कं. यांची प्राकलनीय दरापेक्षा 13.86 टक्के कमी दराची रु. 42,98,296/– ची निम्नतम निविदा प्राप्त आहे. या निविदेस मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1020</u> :– उन्हाळा 2011 मध्ये नागपूर शहरातील पाणी टंचाई वस्त्यात विंधन विहीरी खोदण्याचा कार्यक्रम राबविण्यासंदर्भात खालील प्रस्तावांबाबत यथायोग्य निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. विंधन विहीरींच्या मौक्यांच्या सर्व्हेक्षणाचे काम शासन मंजुर दरांवर भूजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा यांचेकडून करवून घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. 150 मि.मी. व्यासाच्या विंधन विहीरी खोदण्याचे काम शासन मंजूर दरावर भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा हाती घेण्यास तयार असल्यास त्यांचेकडून करवुन घेण्यास मंजुरी प्रदान करणे. अन्यथा निविदाद्वारे दर व एजेन्सी निश्चित करण्यास मंजूरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. 115 मि.मी. व्यासाचे विंधन विहीरी खोदण्याचे काम भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा करित नसल्याने या कामाचे निविदाद्वारे वार्षिक एजेन्सी व दर निश्चित करुन करवून घेण्यास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
4. उन्हाळा 2011 साठी शहरातील पाणी टंचाई वस्त्यात पाणी टंचाई निवारणासाठी रु. 3,39,50,000/– कोटीच्या प्रस्तावित खर्चास मान्यता प्रदान करणे व याकरीता शासकीय अनुदान प्राप्त करण्याची कार्यवाही करण्यास अनुमती देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
5. खर्चाच्या 10 टक्के राशी रु. 33.95 लक्ष लोकवर्गणी स्वरुपात म.न.पा.द्वारे खर्च करावा लागणार आहे. याकरीता रु. 33.95 म.न.पा. फंडातून खर्च करण्यास अनुमती देण्याचा प्रश्न विचारार्थ घेण्यचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1021</u> :– धरमपेठ झोन मधील प्रात्यक्षिक क्षेत्रात 24X7 पाणीपुरवठा योजना अमलात आल्यामुळे उपभोक्तयांचे आंतरिक जलवाहिन्यांमधून गळतीमुळे वया गेलेल्या पाण्यामुळे प्रती कुटूंब प्रती महिना 50 युनीटपेक्षा अधिक नोंद झालेली पाणीपट्टीची रक्कम माफ करण्यासंदर्भात खाली नमुद प्रस्तावांना मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. धरमपेठ झोनमधील 24X7 पाणीपुरवठा प्रात्यक्षिक क्षेत्रातील एकुण 3327 उपभोक्त्यांना 50 युनीट प्रती कुटूंब प्रती महिना प्रमाणे येणाऱ्या पाणीवापरापेक्षा

अधिक पाणीवापराकरिता 01.04.2009 ते 30.09.2010 या कालावधीत देण्यात आलेली पाणीपट्टीची विलंब शुल्कासह येणारी एकुण रु. 3,08,82,343/- ची रक्कम निर्लेखित करणे व त्यानुसार सर्व संबंधित उपभोक्त्यांची देयके दुरुस्त करण्यास मंजुरी प्रदान करण्यचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

2. यापुढे डिसेंबर 2010 पर्यंत देण्यात येणारी अशाप्रकारची देयके 50 युनीट प्रती कुटूंब प्रती महिना प्रमाणे विभागीय स्तरावर दुरुस्ती करण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1022</u> :- नागपूर महानगरपालिका सभेने ठराव क्र. 51, दिनांक 05.02.2010 अन्वये पाणीपट्टीचे दर कमी केल्यानंतर ते पूर्वलक्षी प्रभावाने लागू होतील या धारणेने उपभोक्त्यांनी चालू देयके न अदा केल्यामुळे त्यांना लावण्यात आलेला विलंब शुल्क माफ करण्यासंदर्भात खाली नमुद प्रस्तावांना मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

1. दिनांक 01.01.2010 ते 30.09.2010 या कालावधीत एकुण 1,15,410 उपभोक्त्यांचे पाणीदेयकातील रु. 1,25,12,159/- विलंब शुल्क राशी निर्लेखित करणे व त्यानुसार संबंधित उपभोक्त्यांची देयके दुरुस्त करण्यचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
2. दिनांक 01.01.2010 ते 30.09.2010 या कालावधीत दिनांक 15.11.2010 पर्यंत 1,15,410 उपभोक्त्यांपैकी 27051 उपभोक्त्यांनी अदा केलेल्या देयकासोब्त भरलेली रु. 8,69,338/- राशी उपभोक्त्यांचे पुढील पाणीपट्टी देयकात समायोजित करणे व त्यानुसार संबंधित उपभोक्त्यांची देयके दुरुस्त करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.
3. या निकषाच्या आधारावर अशाप्रकारची देयके विभागीय स्तरावर दुरुस्त करण्यास मंजुरी देण्यचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1023</u> :- नागपूर महानगरपालिकेच्या कन्हान व गोरेवाडा जलशुध्दिकरण केन्द्रांमध्ये निर्जन्तुकीकरणाकरीता लागणाऱ्या द्रव क्लोरीनची निविदा मात्रा संपुष्टात आल्याने, निविदा अटी व शर्तीप्रमाणे 25 टक्के अतिरीक्त मात्रा मंजूर निविदाकार मे. आदीकेम, नागपूर, यांचेकडून खरेदी करण्यास व यावर येणाऱ्या रु. 13,00,312/- चे खर्चासह एकूण रु. 65,01,562/- (52,01,250+13,00,312) चे खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>ठराव क्रमांक 1024</u> :— धरमपेठ झोन क्र. 2 प्रभाग समिती ठराव क्र. 73 दिनांक 14.02.2011 अन्वये पद क्र. 287 मधून रु. 2,85,000/— पद क्र. 326 मध्ये (मनपा मालमत्ता दुरुस्ती) वळते करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून स्थायी समितीकडे मंजूरीकरीता पाठविण्याचा प्रस्ताव एकमताने मंजूर केला. त्यानुसार सदर प्रस्तावास मान्यता देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

मुळ प्रावधान व प्रावधान वळते केल्यानंतरची स्थिती दर्शविणारा तक्ता.

| पद क्र. | 2010—2011 उपलब्ध प्रावधान | खतविलेले प्रावधान | ज्या पदामध्ये वळते करावयाचे आहे त्याचा तपशिल | एकुण प्रावधान वळते करण्याची प्रस्तावित राशी | प्रावधान वळते केल्यानंतरची स्थिती |
|---|---|---|---|---|---|
| 287 | 20.00 लक्ष | 17,15,000/— | पद क्र. 326 रु. 2,85,000/— | 2,85,000/— | एकुण प्रावधान रु. 11.85 पद क्र. 326 मध्ये खतविलेले प्रावधान रु. 6.86 लक्ष आणि पद क्र. 287 मध्ये रु. 0.00 प्रावधान. |
| एकुण | 20.00 लक्ष | 17,15,000/— | रु. 2,85,000/— | 2,85,000/— | |

<u>ठराव क्रमांक 1025</u> :— नागपूर महानगरपालिका अग्निशामक विभागाकरीता नविन 6 नग टाटा L.P.T. 1613/42, 1616/42 चेचीसवर फायर टेन्डर फेब्रीकेशन करण्याकरीता स्थायी समिती यांचे ठराव क्र. 383 दि. 08.11. 2010 ला मंजूरी मिळाल्यानंतर विभागातर्फे राष्ट्रीय स्तरावर वर्तमानपत्रात जाहीरात क्र. 252 दि. 03.01.2011 ला देण्यात आली असून ई—टेन्डरींग माध्यमातून निविदा मागविण्यात आली. प्राप्त झालेले एकुण 7 निविदाकाराचे तांत्रिक बाबीचे चाचणी केल्यानंतर योग्य असलेले 5 निविदाकाराचे दराबाबत निविदा उघडण्यात आली असून निम्नतम दराचे निविदाकार मे. देवी फायर सर्व्हीसेस, सोलापूर यांचे कडून 6 नग फायर टेन्डर फेब्रीकेशन करुन घेण्याकरीता प्रति नग रु. 13,50,000/— प्रमाणे एकुण 6 नग फायर टेन्डर विभागीय स्पेशीफीकेशन प्रमाणे फेब्रीकेशन करुन घेण्यास येणारा एकुण 81,00,000/— च्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| विवरण | एकुण संख्या | प्रति दर | एकुण निम्नतम निविदार दर |
|---|---|---|---|
| 4500 लिटर पाण्याचे क्षमतेचे विभागीय स्पेशीफीकेशन प्रमाणे पंप पी.टी.ओ. सह फायर टेन्डर फेब्रीकेशन | 6 नग | 13,50,000/— | 81,00,000/— |

<u>ठराव क्रमांक 1026</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर